# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२२

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ / पौष ६, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **कृषि मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४७**

---

## राज्यातील महामार्गाकरीता अधिगृहीत केल्या जाणाऱ्या जमिनींच्या भरपाईपोटी शेतकऱ्यांना बाजारभावाच्या दुप्पट दराने नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(१) * १५३९४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामार्गांमध्ये जाणाऱ्या जमिनींना आजपर्यंत बाजारभावाच्या चौपट रक्कम नुकसान भरपाई म्हणून मिळत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुढे नवीन महामार्गांच्या कामासाठी अधिगृहीत करण्यात येणाऱ्या जमिनींची नुकसान भरपाई त्या त्या भागातील चालू बाजारभावाच्या दुप्पट दराने देण्याबाबतचा अध्यादेश दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१ व दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित नवीन महामार्गांमध्ये जाणाऱ्या त्या त्या भागातील बहुतांश जमिनी या चांगल्या प्रतीच्या, पिकाऊ, सिंचीत झालेल्या आणि बारमाही पीक देणाऱ्या असल्यामुळे भूसंपादनाविरुध्द शेतकऱ्यांचा विरोध होणार असून अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे, तर हजारो शेतकरी भूमिहीन होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महामार्गांमध्ये जाणाऱ्या जमीन मालकांचे व शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) शासन अधिसूचना दिनांक ५/१०/२०२१ व शासन निर्णय दिनांक ६/१०/२०२१ व १४/०१/२०२२ नुसार विद्यमान राष्ट्रीय/राज्य महामार्गालगत जी जमीन संपादित करण्यात येत आहे आणि नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिध्द केलेल्या दरांच्या वार्षिक विवरण पत्रांमध्ये विहित केलेली विकास नियोजन क्षेत्रातील आणि प्रादेशिक नियोजन क्षेत्रातील बिगर कृषि दर असणाऱ्या जमिनीबाबत भूसंपादनाचा मोबदला विहित करतांना ज्याने बाजारमूल्यास गुणावयाचे आहे तो घटक (१) एक करण्यात आला आहे.
(३) प्रस्तावित नवीन राष्ट्रीय / राज्य महामार्गामध्ये जाणाऱ्या त्या त्या भागातील कृषि जमिनींसाठी सदर सुधारित तरतूद लागू नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात लम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे पशुधनांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२) * १५९८२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.एकनाथराव खडसे, श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.अनिल परब, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ३२ जिल्ह्यांमधील २७२ तालुक्यांतील २८६९ गावांमध्ये लम्पी नावाच्या चर्मरोगाचा प्रादुर्भाव झाला असून १ लाख २२ हजार ७१५ गोवंशीय संसर्गित पशुधनांपैकी ७,८७७ पशुधन मृत्यूमुखी पडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे शासनाने दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी पूर्ण राज्य नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित केले असून संसर्गित जनावरांसाठी विलगीकरण कक्ष निर्माण करण्याची घोषणादेखील केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लम्पी आजाराचा प्रादुर्भाव रोखण्याच्यादृष्टीने शासनामार्फत युध्दपातळीवर औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि लसीकरण मोहिम राबविण्यात आली आहे परंतु काही जिल्ह्यांमध्ये उक्त लसीकरण मोहिम राबविण्याचा वेग अल्प स्वरुपाचा असल्याने पशुधनांमध्ये लम्पी आजाराचा संसर्ग होऊन गंभीर स्वरुप घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लम्पी आजारामुळे राज्यातील दूध उत्पादनातही घट झाल्याचे पशुसंवर्धन आयुक्तांनी दिलेल्या माहितीद्वारे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, लम्पी आजारामुळे मृत्यूमुखी पडलेल्या पशुधनांच्या पालकांना शासनामार्फत आर्थिक सहाय्य म्हणून केवळ रुपये ४२.७९ लक्ष निधीचे वाटप करण्यात आले असून, पशुपालकांना तातडीने मदत करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पशुधन पालकांना तातडीने आर्थिक सहाय्य करणे, लम्पी आजारावर प्रतिबंध म्हणून लसीकरण मोहिम जलदगतीने राबविणे व संसर्गित जनावरांना विलगीकरण कक्षात ठेवणे याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर राज्यातील ३३ जिल्ह्यात २९१ तालुक्यातील १,७८,०७२ गोवर्गीय पशुधन लम्पी चर्मरोगाने बाधित झालेले असून त्यापैकी ११,५४७ पशुधनांचा मृत्यु झालेला आहे.

दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्य लम्पी चर्मरोगाच्या बाबतीत "नियंत्रित क्षेत्र" म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

दिनांक १२ डिसेंबर, २०२२ अखेर राज्यातील एकूण १,३९,९२,३०४ गोवर्गीय पशुधनांपैकी १,३९,८९,२१२ पशुधनास लम्पी प्रतिबंधात्मक गोटपॉक्स लसीचे लसीकरण करण्यात आले असून, सदर रोगाचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रित करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या लम्पी चर्मरोग नियंत्रणासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार संसर्गित जनावरांसाठी आवश्यकतेनुसार विलगीकरण कक्ष निर्माण करण्याबाबत जिल्हा पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

(४), (५), (६) व (७) राज्यातील दिनांक १२/१२/२०२२ अखेर एकूण १,३९,९२,३०४ गोवर्गीय पशुधनांपैकी २.७१ टक्के पशुधन लम्पी चर्मरोगाने बाधित झालेले असून त्याचा राज्यातील एकंदरीत दूध उत्पादनावर विपरीत परिणाम दिसून येत नाही.

शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२ अन्वये शेतकरी, पशुपालक यांच्या मृत पशुधनास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती निवारण धोरणामधील आर्थिक निकषानुसार अर्थसहाय्य अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये प्रती मृत गाय रुपये ३०,०००/-, प्रती मृत बैल रुपये २५,०००/- व प्रती मृत वासरु रुपये १६,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय करण्यात आलेले आहे.

दिनांक १२/१२/२०२२ अखेर एकूण रुपये ३३८३.८५ लक्ष निधी मृत पशुधनांच्या पशुपालकांस अर्थसहाय्यापोटी वाटप करण्यात आला आहे. उर्वरित अर्थसहाय्य वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय दिनांक १६/०९/२०२२, दिनांक १०/१०/२०२२ व दिनांक ९/१२/२०२२ अन्वये लम्पी चर्मरोग नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हा नियोजन समिती कडील निधीतून प्रत्येक जिल्ह्यास एकूण रुपये ३.०० कोटी निधी औषधे व साधनसामग्री / उपकरणे खरेदी, लसीकरणासाठी सेवा दात्यांना देण्यात येणारे मानधन, मृत पशुधनाची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे, आवश्यक तेथे औषध फवारणी करणे व इतर अनुषंगिक बाबींवर खर्च करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या निधीमधून टास्कफोर्स व महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखालील उपचार प्रोटोकॉल नुसार जिल्हास्तरावर औषधांची उपलब्धता करण्यात आलेली आहे.

राज्यातील गोवंशीय पशुधनामध्ये उद्भवलेल्या विषाणूजन्य लम्पी चर्मरोग नियंत्रणात आणण्यासाठी राज्यस्तरीय कार्यदलाचे गठण करणे, राज्यातील गोवर्गीय पशुधनामध्ये १०० टक्के मोफत लसीकरण व उपचार, लंपी चर्म रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीची स्थापना करणे, शेतकरी, पशुपालक यांच्या मृत पशुधनास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती धोरणामधील आर्थिक निकषानुसार अर्थसहाय्य देणे, इत्यादीच्या माध्यमातून सदर रोगाचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रित करण्यात येत आहे.

----------------

## बुलेट ट्रेनसाठी पालघर व ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनींचा मोबदला देण्याबाबत

**(३) * १६२५२ श्री.अंबादास दानवे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बुलेट ट्रेनसाठी जमिनी संपादित करण्यात आल्या असून बीकेसीतील ५.६५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) ने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलेट ट्रेनसाठी पालघर, ठाणे या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत, बुलेट ट्रेन मार्गातील जमिनी ह्या राज्याबाहेरील परप्रांतीय व्यक्तींनी खरेदी केल्या असून संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देताना आदिवासी भागातील शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई-अहमदाबाद प्रस्तावित बुलेट ट्रेन प्रकल्पाकरीता श्री.उंदऱ्या दोडे, अंजूरगाव (ता.भिंवडी, जि.ठाणे) यांना बाधित जमिनीचा मोबदला मिळाला नसल्यामुळे त्यांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली असून याप्रकरणी संबंधित दोषी अधिकारी व विकासक यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबाबत तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत बाधितांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूसंपादनाची चौकशी करुन बोगस लाभार्थी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच स्थानिक शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बुलेट ट्रेनसाठी पालघर, ठाणे या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. परंतु, आदिवासी भागातील शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याची बाब निदर्शनास अद्याप आलेली नाही.

(३) व (४) श्री.उंदऱ्या दोडे प्रकरणी अतिरीक्त जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करुन चौकशी अहवालाबाबत संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह उपायुक्त (भूसंपादन) कोकण व चौकशी अधिकारी यांना दिनांक ०७/१०/२०२२ रोजी सह सचिव (भूसंपादन) यांचे दालनात उपस्थित राहण्याबाबत शासनाने निर्देश दिले होते. परंतु, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे. अभिप्रायासह अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गंत गट “अ” ते गट “ड” संवर्गातील पदभरतीचे कंत्राट विनानिविदा ब्रिस्क इंडिया प्रा. लिमिटेडला दिल्याबाबत

**(४) * १५०९५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गंत गट “अ” ते गट “ड” संवर्गातील २४७ पदांच्या भरतीचे कंत्राट विनानिविदा पुणे येथील ब्रिस्क इंडिया प्रा. लिमिटेड या कंपनीला देण्यात आले असल्याची बाब दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भरतीचे कंत्राट बेकायदेशीररित्या विनानिविदा ब्रिस्क इंडिया प्रा. लिमिटेड या कंपनीला देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने ब्रिस्क इंडिया प्रा.लिमिटेड या कंपनीला विनानिविदा कंत्राट देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) हे खरे नाही, शासनाच्या कार्यालयात कंत्राटी मनुष्यबळाचा पुरवठा करण्याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने ई-निविदा प्रक्रिया राबवून निवड केलेल्या कंपन्यांच्या पॅनलमध्ये मे. ब्रिस्क कंपनीचा समावेश असून त्या विभागाच्या दिनांक १८/०६/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मंजूर आकृतीबंधातील बाह्य यंत्रणेव्दारे भरावयाची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यासाठी विनानिविदा मे. ब्रिस्क कंपनीला मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमध्ये “टॅब्लेट” खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(५) * १५१०६ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेश कराड, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमध्ये (महाज्योती) विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलेल्या टॅब्लेट खरेदीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराचा चौकशी अहवाल सादर होईपर्यंत तसेच शासनाचे निर्देश प्राप्त होईपर्यंत टॅब्लेट खरेदीसाठीच्या निविदेला स्थगिती द्यावी असे आदेश महाज्योतीच्या व्यवस्थापकीय संचालकांना तत्कालीन मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांनी दिले असतानाही सदर आदेशाला न जुमानता कंत्राटदाराला कार्यादेश देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टॅब्लेट खरेदीसाठी कार्यादेश दिलेल्या कंत्राटदार कंपनीने अनामत रक्कम भरलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांसाठीच्या टॅब्लेट खरेदीत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२), व (३) हे खरे नाही.

महाज्योती संस्थेमार्फत स्पर्धा परीक्षेचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यासाठी नोंदणीकृत प्रशिक्षणार्थींना टॅब देण्याकरीता GEM पोर्टलवर निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, टॅब खरेदी प्रकरणी तक्रारी प्राप्त झाल्याने निविदा प्रकिया स्थगित करुन स्वयंस्पष्ट अहवाल मागविण्यात आला होता.

तद्नंतर महाज्योती संस्थेच्या दिनांक १७/०६/२०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने खरेदी प्रक्रियेवर चर्चा करून सर्वात कमी दर असलेल्या पुरवठादाराच्या अनामत रक्कमेची खात्री करुन टॅब खरेदीस कार्यादेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सेंद्रिय शेतीतील उत्पादित मालाला योग्य भाव मिळणेबाबत

**(६) * १५७१५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करावी यासाठी राज्य शासन आग्रही असले तरी सेंद्रिय शेती करणे शेतकऱ्यांना फायदेशीर नसून सेंद्रिय शेतीतील उत्पादकतेमध्ये २५ ते ३० टक्के घट असते तसेच उत्पादित बाजाराला योग्य बाजारपेठ मिळत नाही इ. समस्या सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जाणवत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात एकूण पिकाऊ क्षेत्र ४ लाख हेक्टर असले तरी ७४० हेक्टर जमिनीवर सेंद्रिय शेती केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यात सेंद्रिय शेतीतील उत्पादित मालाला योग्य भाव मिळावा याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत सेंद्रिय शेती गटामार्फत उत्पादित केलेल्या सेंद्रिय शेतमालाला रास्त भाव मिळण्याकरीता पॅकिंग व ब्रॅडिंग करुन शेतमाल विक्री करण्यात येतो. कोल्हापूर जिल्ह्यात सदर योजनेंतर्गत चिकोत्रा, दुधगंगा, कासारीखोरे, श्रीसिध्देश्वर इत्यादी ब्रॅंड विकसित करुन त्यांच्यामार्फत विक्री

करण्यात येते यासाठी गटातील शेतकऱ्यांना योजनेतून पॅकेजिंग साहित्य (प्रिंटिंगसह), धान्य बॅग पुरवठा इत्यादी बाबींचा लाभ देण्यात आलेला आहे.

तसेच सदर सेंद्रिय उत्पादित शेतमालाच्या विपणनाकरीता शेतकरी मेळावे, जिल्हा कृषि महोत्सव, तालुकास्तरीय कृषि प्रदर्शने, सेंद्रिय शेती मेळावे, पिकेल ते विकेल मोहिमेअंतर्गत विक्री व्यवस्था उपलब्ध करुन देण्याचे कृषि विभागामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. सेंद्रिय मालाच्या विक्री करीता मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रोजेक्ट (मॅग्नेट) इत्यादी योजनांच्या अभिसरणाद्वारे मुल्यसाखळी विकसित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरूड-जंजिरा (जि.रायगड) येथील मच्छिमारांना आदिवासी विभागाच्या खावटी अनुदानाप्रमाणे लाभ देण्याबाबत

**(७) * १५५७५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड-जंजिरा (जि.रायगड) येथे झालेल्या अतिवृष्टी व वाऱ्यामुळे समुद्रात भरती आल्याने मासेमारी करण्यासाठी गेलेल्या नौका मासे न मिळाल्याने परतल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासेमारी ही हवामानावर अवलंबून असल्यामुळे मच्छिमारांना ही शेतकऱ्यांप्रमाणेच ओला दुष्काळ जाहीर करून आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या खावटी अनुदानाप्रमाणे मच्छिमारांना विभागाकडून लाभ देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मच्छिमारांना खावटी अनुदान योजनेचा लाभ देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) माहे ऑगस्ट, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीतील खराब वातावरणामुळे तसेच हवामान खात्याकडून प्राप्त संदेशानुसार मच्छिमारांना काही कालावधीसाठी मासेमारी करता आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) समुद्रातील मासेमारी ही पूर्णत: हवामानावर अवलंबून असते. अतिवृष्टी/चक्रीवादळे यामुळे मच्छिमारांचे नुकसान झाल्यास मच्छिमारांना देण्यात येणारी नुकसान भरपाई ही मदत व पुनर्वसन विभागामार्फत देण्यात येते. निसर्ग व तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानापोटी अनुक्रमे रुपये १.३६७ कोटी व रुपये ९.२८०६ कोटी इतकी रक्कम महसूल विभागाकडून बाधित मच्छिमारांना देण्यात आलेली आहे.

तसेच, सन २०१९-२० या कालावधीत राज्यातील सागरी मच्छिमारांना क्यार व महा चक्रीवादळामुळे पूर्ण क्षमतेने मासेमारी करता न आल्यामुळे रुपये ६५,१७,२०,०००/- इतके विशेष सानुग्रह अनुदान अदा करण्यास शासन निर्णय दिनांक ०९/०९/२०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये ४८.२७ कोटी इतका निधी आतापर्यंत वितरीत करण्यात आला असून उर्वरीत निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दस्त नोंदणी करण्यासाठी बनावट दाखला देण्यात येत असल्याबाबत

**(८) * १५९२९ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर विभागातील नांदेड जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी बनावट बिनशेती आदेश तसेच गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र तयार करुन दुय्यम निबंधकांची फसवणूक करुन दस्तऐवज नोंदणी करण्याची ९७ प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित ८३ व्यक्तींवर दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणी अधिकारी यांच्याकडून भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ८३ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सह जिल्हा निबंधक वर्ग-१ कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालयात ३ प्रकरणे आढळून आली असून सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पुणे शहर यांनी दिनांक २७ जानेवारी, २०२२ नुसार विशेष तपासणी पथक स्थापन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पथकाने सह दुय्यम निबंधक हवेली क्रमांक ३ या कार्यालयातील दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ ते २५ जानेवारी, २०२२ या कालावधीतील नोंदविलेल्या दस्तांची तपासणी केली असता त्यामध्ये बनावट एन.ए.ऑर्डर/भोगवटापत्र/नियमितीकरण दाखला असलेली एकूण ११२ दस्त व सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२४ येथील ३ अशी एकूण ११५ प्रकरणे आढळून आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.३ मधील ११२ प्रकरणांपैकी बनावट एन. ए. ऑर्डर/भोगवटापत्र/नियमितीकरण दाखल्यांची पडताळणी करण्यात आलेल्या २६ प्रकरणांमध्ये ११ गुन्हे हडपसर पोलीस स्टेशन, पुणे येथे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

लातूर विभागामध्ये काही ठिकाणी बनावट बिनशेती आदेश तसेच गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र तयार करुन दुय्यम निबंधकांची फसवणूक म्हणजेच शासनाची फसवणूक करुन दस्तऐवज नोंदणी केल्याबाबत तसेच नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण ९७ प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत.

(२) सदर प्रकरणी प्रस्तुत दस्तऐवजांमध्ये बनावट बिनशेती आदेश व बनावट गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्राचा वापर संबंधित पक्षकारांनी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणी अधिकारी यांनी भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८३ अन्वये गुन्हे दाखल केलेले असून त्याचे सविस्तर विवरणपत्र पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | एकूण नोंदणी झालेल्या व्यक्तींवर गुन्हे दाखल झालेली संख्या |
|---|---|---|
| १) | सह दुय्यम निबंधक नांदेड क्र.१ | ८३ दस्तऐवजामध्ये ६९ व्यक्तींवर गुन्हे दाखल केले आहेत. |
| २) | सह दुय्यम निबंधक नांदेड क्र.२ | नोंदणी झालेल्या एकूण १ दस्तऐवजामध्ये १ व्यक्तीवर गुन्हा दाखल झालेला आहे. |
| ३) | सह दुय्यम निबंधक नांदेड क्र.३ | या कार्यालयातील नोंदणी झालेल्या एकूण १३ दस्तऐंवजामध्ये १३ व्यक्तींवर गुन्हे दाखल केलेले आहेत. |
| ४) | लातूर जिल्ह्यामध्ये | एकूण ५ प्रकरणे निदर्शनास आले असून ५ दस्तांमध्ये ७ व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. |

(३) होय, हे खरे आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पुणे शहर,पुणे ग्रामीण,सातारा,सांगली, कोल्हापूर व सोलापूर पैकी सह जिल्हा निबंधक पुणे शहर कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.२४ या कार्यालयात ३ प्रकरणे आढळून आलेली आहे. त्याअनुषंगाने सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पुणे शहर यांनी त्यांच्या दिनांक २७/०१/२०२२ रोजीच्या पत्रानुसार यासाठी विशेष तपासणी पथक स्थापन केलेले होते.

(४) होय, हे खरे आहे.

सदर पथकाने सह दुय्यम निबंधक हवेली क्रमांक ३ या कार्यालयातील दिनांक ०५/१०/२०२१ ते २५/०१/२०२२ या कालावधीतील नोंदविलेल्या दस्तांची तपासणी केलेली आहे. त्यामध्ये बनावट एन.ए. ऑर्डर/भोगवटापत्र/नियमितीकरण दाखला असलेली एकूण ११२ दस्त आढळून आले असून, सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२४ येथील ३ अशी एकूण ११५ प्रकरणे आढळुन आली आहेत.

(५) व (६) सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.३ मधील ११२ प्रकरणांपैकी बनावट एन.ए. ऑर्डर/भोगवटापत्र/नियमितीकरण दाखल्यांची सत्यता पडताळणी होऊन आलेल्या २६ प्रकरणांमध्ये ११ गुन्हे हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे दाखल करण्यात आलेले आहेत. उर्वरीत ८६ प्रकरणे एन. ए. ऑर्डर/ भोगवटापत्र/नियमितीकरण दाखल्यांची सत्यता पडताळणीसाठी मा.जिल्हाधिकारी पुणे, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे पाठविण्यात आलेली आहेत. सदर प्रकरणांची सत्यता पडताळणी होऊन आल्यानंतर गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करणेत येईल. सह दुय्यम निबंधक वर्ग-२ हवेली क्र.२४ येथील ३ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करणेसाठी दापोडी पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज दिलेला असून गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे वसाहतीत (गोरेगाव, जि. मुंबई उपनगर) येथील अंतर्गत रस्त्यांच्या झालेल्या दुरवस्थेबाबत

**(९) * १५५२९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे वसाहत (गोरेगाव, जि. मुंबई उपनगर) येथील २७ आदिवासी पाड्यांकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्याने स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरेतील अंतर्गत रस्ते सुस्थितीत ठेवण्याकरीता पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागास शासनामार्फत निधी देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागास मिळत असलेल्या तुटपुंज्या निधीमुळे सदर रस्ते कायमस्वरूपी सुस्थितीत ठेवण्यास पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागास अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने वाढीव निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) आरे वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी रुपये ४८ कोटी इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने तांत्रिक मान्यता दिली असून, प्रशासकीय मान्यता तसेच वित्तीय तरतूद करण्यासाठी प्रस्ताव वित्त विभागास पुरवणी मागणीद्वारे दिनांक १६/११/२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. पुरवणी मागणी मान्य झाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वन विभागांतर्गत रोजंदारी तत्वावर कार्यरत वन मजूरांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१०) * १५६४० श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके : तारांकित प्रश्न क्रमांक १२७५१ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागांतर्गत गत २५ वर्षांपासून (सन १९९४ पासून) नागपूर, कोल्हापूर, ठाणे, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यात तसेच किनवट (जि.नांदेड) येथे रोजंदारी तत्वावर वनमजुर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, १९९४ पासून दिनांक ३० जून, २००४ पर्यंत सलग पध्दतीने अथवा तुटक-तुटकरित्या प्रतिवर्षी किमान २४० दिवस याप्रमाणे किमान ५ वर्षे काम केलेल्या, दिनांक १ नोव्हेंबर, १९९४ पासून दिनांक ३० जून, २००४ पर्यंत कार्यरत असणाऱ्या रोजंदारी मजुरांना दिनांक १ जून, २०१२ पासून शासन सेवेत कायम करण्याचा शासन निर्णय दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वन विकास महामंडळातील नागपूर, कोल्हापूर, ठाणे, किनवट, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यातील तसेच किनवट (जि.नांदेड) येथील ११५८ पात्र वन मजूरांना शासन निर्णय दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ नुसार शासन सेवेत सामावून घेण्याचे नागपूर खंडपीठाने आदेश देवूनही अद्याप वनमजूरांना शासन सेवेत सामावून घेतले नसल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर वनमजूरांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मराठवाड्यात सोयाबीन पिकांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(११) * १५३२५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाड्यात सततचे दमट वातावरण, पिकाची झालेली अधिकची वाढ, बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव, वातावरणातील बदल यामुळे यावर्षी ऐन बहरात असलेल्या सोयाबीन पिकावर करपा या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामात ८० टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्रावर सोयाबीन पिकांची लागवड केली जात असून करपा या रोगामुळे पीक वेळेअगोदर काढणीस येणे, उत्पादनात घट होणे तसेच सोयाबीनच्या शेंगा पापडी होत असल्याने त्या न भरल्याने सोयाबीनच्या उत्पादनावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच सोयाबीन पिकावर होणाऱ्या करपा या रोगाच्या प्रादुर्भावाबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

मराठवाड्यामधील बीड जिल्ह्यात माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२२ मध्ये बहुतांश महसूल मंडळात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकासाठी दमट वातावरण निर्माण झाले होते, त्यामुळे ऐन बहरात असलेल्या सोयाबीन पिकावर बीड, अंबेजोगाई व केज तालुक्यात मिळून एकूण १९४२८८ हे. क्षेत्रापैकी अंदाजित ५२८८ हे. क्षेत्रावर करपा या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला.

प्रादुर्भावित क्षेत्रावर नियंत्रण करण्यासाठी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र शास्त्रज्ञ यांच्या मदतीने शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. त्यामध्ये शेतकरी मेळावे संख्या-७५, शेतकरी प्रशिक्षण संख्या-५०, शेतीशाळा संख्या-३१, जम्बो झेरॉक्स (कृषि सल्ला)-२७०००, तसेच प्रचार प्रसिद्धीसाठी, स्थानिक वर्तमानपत्र, स्थानिक वृत्त वाहिनी, जिल्हा मासिक चर्चासत्र, whatsapp group द्वारे संदेश याद्वारे जनजागृती करण्यात आली. त्यामुळे सदर प्रादुर्भाव नियंत्रणात आला.

मराठवाड्यामधील उर्वरित औरंगाबाद, जालना, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी व हिंगोली या जिल्ह्यांमध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत

**(१२) * १५९६५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील खरीप व रब्बी हंगाम सन २०२२ करीता रुपये १,६३८ कोटींचे पीक कर्ज वाटपांचे उद्दिष्ट शासनाच्यावतीने बँकांना देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत चार वर्षात विविध बँकानी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण न केल्याने बँकांनी उदिष्ट पूर्ण करावे यासाठी जिल्हा प्रशासन, परभणी यांच्या स्तरावरून उपाययोजना करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कमी पीककर्ज वाटप करणाऱ्या बँकाविरुध्द कारवाईचा अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत व्यवस्थापक, अग्रणी (लीड) बँक यांना मा.पालकमंत्री, परभणी यांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कमी पीक कर्ज वाटप करणाऱ्या बँकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, तथापि, सन २०२२-२३ करीता परभणी जिल्ह्यामध्ये पीक कर्ज वाटपासाठी रुपये १,८२८ कोटींचा सुधारीत लक्षांक निर्धारीत करण्यात आला आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर बैठकीत कर्जवाटप वाढविण्याबाबतच्या सूचना जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांना दिल्या आहेत.

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील खरीप हंगामासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणी, व्यापारी व खाजगी बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकांसाठी एकूण रुपये १२०४.१५ कोटी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक होता. त्यानुसार सदरील बँकांनी दिनांक ३०/०९/२०२२ अखेर १.०९ लाख शेतकऱ्यांना रुपये ८३६.३५ कोटी पीक कर्ज वाटप केले असून त्याची टक्केवारी ६९.४६ % एवढी आहे.

तसेच रब्बी हंगामासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणी, व्यापारी व खाजगी बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकांसाठी एकूण रुपये ६२४.८२ कोटी पीक कर्ज वाटपाचा लक्षांक होता.त्यानुसार सदरील बँकांनी दिनांक ०३/१२/२०२२ अखेर १६,४१८ शेतकऱ्यांना रुपये १५१.३३ कोटी पीक कर्ज वाटप केले असून त्याची टक्केवारी २४.२२ % एवढी आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आनंदवाडी (ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथे अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत

**(१३) * १५१९२ श्री.प्रसाद लाड : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक १२९२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंदवाडी (ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथे अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत सातव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करूनही दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या दिनांक ३१ मार्च, २००७ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित केले तसेच दिनांक २२ जुलै, २००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २९.१३ कोटी रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळूनदेखील सन २००५-२००६ अखेरपर्यंत सदर प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रकल्पाच्या कामास सन २००५-२००६ पर्यंत सुरुवात न केल्यामुळे सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या बाबीच्या अनुषंगाने तत्कालीन सरकारने सदर प्रकल्पासाठी एकूण रुपये १५ कोटी ६९ लाख ९ हजार इतकी आर्थिक तरतूद करुन पतन अभियंता, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २००७ रोजी कंत्राटदार मे.आर.बी. चव्हाण, गोरेगाव, मुंबई यांना कार्यारंभ आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २६ डिसेंबर, २००७ रोजीपासून या प्रकल्पाच्या तीन टप्प्यापैकी पहिल्या टप्प्यातील कामास शासनाने रुपये ५ कोटी १७ लाख ३३ हजार इतकी रक्कम खर्च करुनही सदर काम माहे मे, २००८ पासून पूर्णत: बंद होऊन अंदाजित खर्च वाढल्यामुळे केंद्र शासनाकडून सुधारित प्रस्तावान्वये रुपये ९३.५० कोटी इतक्या रकमेस दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी मान्यता मिळाल्यानंतर सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाच्या खर्चाचे पूरक विवरण पत्रान्वये रुपये २६ कोटी ८ लाख ७० हजार इतक्या रकमेची आर्थिक तरतूद करुनही सदर कामास अद्याप सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रलंबित काम पुन्हा सुरु करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी देवगड येथील मच्छिमारी सहकारी संस्था, तारामुंबरी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आदींनी तहसिलदार, देवगड यांना तसेच दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा.मत्स्यव्यवसाय मंत्री आदींकडे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आनंदवाडी मत्स्यव्यवसाय बंदराच्या उभारणीचे काम विनाविलंब सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना/कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

आनंदवाडी येथील मत्स्यबंदराच्या बांधकामास दिनांक २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सु-सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी देवगड येथील मच्छिमारी सहकारी संस्था, तारामुंबरी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आदींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर मत्स्यबंदराच्या बांधकामाची गती वाढविण्याबाबत महामंडळाने कंत्राटदारास कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील केळी पिकावरील सीएमव्ही रोगाचे उच्चाटन करण्याबाबत

**(१४) * १५२९० श्री.एकनाथराव खडसे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानदेशातील जळगाव जिल्ह्यात ४५ हजार हेक्टर क्षेत्रांवर केळीचे पीक घेतले जात असून हेक्टरी ५०/६० टन एवढे उत्पादन मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव जिल्ह्यात केळी या पिकावर कुकंबर मोझॅक विषाणू (सीएमव्ही) या रोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीएमव्ही या रोगाच्या प्रादुर्भावाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या केळी पिकांचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना थेट अनुदान मिळणे अपेक्षित असताना केळीच्या पुनर्लागवडीसाठी निम्म्या अनुदानावर रोपे देण्याचे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना थेट अनुदान देणेबाबत तसेच सीएमव्ही या रोगाचे उच्चाटन करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२०-२१ च्या अंतिम अंदाजानुसार जळगाव जिल्ह्यात केळीचे क्षेत्र ४४९२९ हेक्टर असून उत्पादकता हेक्टरी ७० टन आहे.

(२) हे खरे आहे.

सी.एम.व्ही मुळे एकूण ८७७०.८५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.

(३) कीडीच्या प्रादुर्भावामुळे जळगाव जिल्ह्यात झालेल्या केळी पिकाची नुकसान भरपाई देण्याऐवजी नवीन रोपांच्या लागवडीसाठी अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव तपासून सादर करावा असे निर्देश राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत प्राप्त झाले आहेत.

(४) सीएमव्ही या रोगाच्या प्रादुर्भावाने बाधित क्षेत्राचे संयुक्त पंचनामे करण्यात आले आहेत. बाधित क्षेत्राला मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

सीएमव्ही रोगाचे प्रतिबंधात्मक व निर्मुलनात्मक उपाययोजनेची कृषि विभागामार्फत कृषि विस्तार माध्यमाव्दारे कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## जालना येथे रेशीम महाविद्यालय स्थापन करणेबाबत

**(१५) * १५३२० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील ८ जिल्हयांमध्ये तुती लागवड करण्यासाठी उपयुक्त हवामान असल्याने जवळपास ५००० हेक्टर क्षेत्र तुती लागवडीखाली असून त्यापैकी १००० हेक्टर क्षेत्र (२० टक्के) फक्त जालना जिल्ह्यात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये कर्नाटक राज्याच्या धर्तीवर जालना येथे शासकीय रेशीम कोष खरेदी केंद्राची स्थापना करण्यात आली असून कापड निर्मिती, हातमाग, यंत्रमाग इत्यादी उद्योग सुरु करण्यासाठी मोठी संधी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषि तंत्र विद्यालय, जालना यांचे बळकटीकरण करुन रेशीम महाविद्यालय स्थापन करण्यासाठी कृषि विद्यापीठाने परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जालना येथे रेशीम महाविद्यालय स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) अंशत: खरे आहे.

माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर मराठवाड्यातील ८ जिल्ह्यात एकूण ३२८६ हेक्टर क्षेत्र तुती लागवडीखाली अस्तित्वात आहे. त्यापैकी जालना जिल्ह्यात ३४० हेक्टर क्षेत्र तुती लागवडीखाली आहे.

(२) हे खरे आहे.

सन २०१८-१९ मध्ये रेशीम संचलनालय व कृषि उत्पन्न बाजार समिती यांचे संयुक्त विद्यमाने जालना येथे शासकीय कोष खरेदी - विक्री केंद्र सुरू करण्यात आले असून जालना येथे कापड निर्मिती, हातमाग, यंत्रमाग इत्यादी उद्योग खाजगी स्तरावर सुरू करण्यासाठी स्थानिक रिलर्स व विणकर यांना मोठी संधी उपलब्ध आहे.

(३) अंशत: खरे आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत जालना येथे रेशीम महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव कृषि विद्यापीठाने विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्याकडे शिफारशीत केला आहे.

(४) जालना येथे रेशीम महाविद्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेस्तरावर विचाराधीन असून, कृषि परिषदेच्या मान्यतेनंतर जालना येथे रेशीम महाविद्यालय स्थापनेबाबत आवश्यक सोयी-सुविधा विचारात घेवून प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन करणेबाबत

**(१६) * १५२६३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरीप पीक कर्जाचे पुनर्गठन व व्याजात सवलत देऊन दुष्काळी ३६३ गावातील जिरायती शेतकऱ्यांना दिलासा दिला असून पुनर्गठीत कर्जावरील पाचही वर्षाचे १३.५० टक्के व्याज शासनाने भरणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड, उस्मानाबाद, लातूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी सन २०२०-२०२१ मध्ये पीक कर्ज घेतले होते परंतु त्यावेळी झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होऊन त्यातून पीक खर्चाची रक्कम मिळाली नसल्यामुळे पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२२ च्या खरीप हंगामाकरीता नवीन पीक कर्ज अनुदान व पीक विमा वाटप करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ मधील पीक कर्जाचे पुनर्गठन करून नवीन पीक कर्ज अनुदान व पीक विमा वाटप करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) सन २०२२ च्या खरीप हंगामासाठी बीड, उस्मानाबाद, लातूर जिल्ह्यामध्ये खालीलप्रमाणे कर्जवाटप करण्यात आले आहे.

| जिल्हा | शेतकरी | कर्जवाटप | टक्केवारी |
|---|---|---|---|
| बीड | १.८६ लाख | १४७३.६८ कोटी | ८३.७३ % |
| उस्मानाबाद | १.२६ लाख | १०६९.५६ कोटी | ७८.१७ % |
| लातूर | २.७६ लाख | १८१६.९७ कोटी | ९०.८५ % |

तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम-२०२२ अंतर्गत दिनांक ०८/१२/२०२२ अखेर बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकुल परिस्थिती व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबीअंतर्गत नुकसान भरपाई निश्चिती व वाटप तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | नुकसान भरपाई निश्चिती रुपये कोटी | नुकसान भरपाई वाटप रुपये कोटी |
|---|---|---|
| बीड | १६६.८४ | १६५.९२ |
| उस्मानाबाद | ३७९.९८ | २५४.९३ |
| लातूर | २११.३८ | १४९.६४ |

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) संस्थेस आर्थिक संकटातून बाहेर काढण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१७) * १६३४८ श्री.सचिन अहिर : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक १०३११ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) संस्था सन २०२१ पासून आर्थिक अडचणीत असून संस्थेच्या तोट्यात रुपये १५.४६ कोटीपेक्षा अधिक वाढ झाली असल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डबघाईस आलेल्या महानंद संस्थेच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी महानंदचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्याऐवजी प्रशासकाची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानंदला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी मा.मंत्री, दुग्धव्यवसाय विकास यांच्या अध्यक्षतेखाली महानंदचे माजी संचालक, सचिव, दुग्धविकास विभाग, आयुक्त तसेच डेअरीच्या संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सदर संस्थेचे व्यवस्थापन राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाकडे (एनडीडीबी) सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) संस्थेला आर्थिक अडचणीतून बाहेर काढणे तसेच प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महानंदला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासंदर्भात दिनांक ३/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळ (NDDB) व महानंद यांची संयुक्त बैठक आयोजित करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाचा अहवाल अप्राप्त आहे.

(४) महासंघास आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासनाने दुध भुकटी व बटर स्वरुपात सुमारे रुपये ७० कोटी इतके भाग भांडवल महासंघास उपलब्ध करुन दिले आहे. दिनांक २२/०८/२०२२ च्या पत्रान्वये महानंदवर प्रशासकाची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालवणी, मालाड (पश्चिम) व विलेपार्ले परिसरातील शासकीय भूखंडावर स्टुडिओ उभारताना झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१८) * १६४५७ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवणी, मालाड (पश्चिम) परिसरातील शासकीय भूखंडावरील मोकळ्या जागेत मोठे स्टुडिओ उभारण्याचा गैरव्यवहार निदर्शनास आला असतानांच विलेपार्ले येथील गोल्डन टोबॅको कंपनीच्या आवारातील मोकळ्या भूखंडावर देखील स्टुडिओची उभारणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोकळ्या भूखंडावर बांधकाम करण्यासाठी पालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाकडून परवानगी घ्यावी लागत असून पालिकेच्या के पश्चिम विभागाने शेड उभारण्यासाठी तात्पुरती परवानगी दिली असतानांही या ठिकाणी पक्के बांधकाम असलेले स्टुडिओ उभारण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू स्टुडिओत दिवस-रात्र चित्रीकरण सुरू असल्यामुळे शेजारील आठ-दहा सोसायट्यांना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होत असल्यामुळे स्थानिक रहिवाशांनी दंड लागू केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मालवणी, मालाड (पश्चिम) व विलेपार्ले परिसरातील स्टुडिओ उभारण्याबाबत गैरव्यवहार केलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) विलेपार्ले (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या के/ पश्चिम विभागाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या गोल्डन टोबॅको कंपनीच्या आवारातील मोकळ्या तात्पुरत्या स्वरुपात बांधकाम करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रचलित धोरण क्र.SL/२९५७५/ADVT, दिनांक ०१/०३/२०१९ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिली आहे. सदरची जागा ही खाजगी आहे.

(२) सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम करण्यात आले नसून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार चित्रीकरणासाठी तात्पुरत्या स्वरुपात शेड उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. सदर ठिकाणी कोणतेही पक्के बांधकाम करण्यात आले नसल्यामुळे इमारत व प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

(३) सदर स्टुडिओमध्ये दिवस-रात्र सुरु असलेल्या चित्रीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनीप्रदूषण होत असल्याने या विरोधात आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे सातत्याने लेखी निवेदनाव्दारे तेथील नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत. तथापि, सदर स्टुडिओमध्ये चित्रीकरणासाठी परवानगी दिलेल्या तात्पुरत्या शेड मध्ये ध्वनीरोधक साहित्य वापरलेले आहे. सबब, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) मुंबई उपनगर जिल्ह्यातील मढ-मार्वे, एरंगळ, भाटी व मालाड येथील अवैध स्टुडिओ बांधकामाची चौकशी करण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या दिनांक ०६/०९/२०२२ रोजीच्या आदेशाव्दारे समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिमाशंकर (जि.पुणे) अभयारण्यातील वैयक्तिक व सामूहिक दावे निकाली काढण्याबाबत

**(१९) * १६६१६ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमाशंकर (जि.पुणे) अभयारण्यातील जैवविविधता टिकून रहावी यासाठी अभयारण्य धोकाग्रस्त वन्यजीव अधिवास घोषित करण्याकरीता दहा जणांचा समावेश असलेली तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभयारण्यातील वैयक्तिक व सामूहिक दावे निकाली निघेपर्यंत जंगलातील धोकाग्रस्त अधिवास निर्मितीची कोणतीही प्रक्रिया करु नये, प्रथम जमिनीचे विषय सोडवावे तद्नंतर पुढील चर्चा करावी असा निर्णय ग्रामस्थांनी भिमाशंकर येथील जुने एमटीडीसी येथे आयोजित केलेल्या तज्ज्ञ समितीच्या बैठकीत दिला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी समाजाचा अधिकार आबाधित ठेवून ग्रामस्थांची वैयक्तिक व सामूहिक प्रलंबित दावे निकाली काढण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६, नियम-२००८ व सुधारित नियम, २०१२ अन्वये भिमांशकर वन्यजीव अभयारण्यातील दाव्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे :

भिमाशंकर वनपरिक्षेत्र १ अंतर्गत ३७ वैयक्तिक दावे व १ सामुहिक दावा आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून २७ वैयक्तिक दावे नामंजूर करण्यात आले असून उर्वरित १० वैयक्तिक दावे व १ सामूहीक दाव्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

भिमाशंकर वनपरिक्षेत्र २ अंतर्गत ३६ वैयक्तिक दावे आहेत. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून १९ वैयक्तिक दावे मंजूर करण्यात आले असून उर्वरित १७ नामंजूर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगांव (जि.सातारा) शहरातील धोम डावा कालवा वितरिकेकरिता अधिगृहीत केलेल्या जमिनींच्या संपादन मूल्याचे क.जा.प. (कमी जास्त पत्रक) बनवूनसुध्दा त्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(२०) * १६६७७ श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ११३६१ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (जि.सातारा) शहरातील सन १९८१ मध्ये धोम डावा कालवा (डी.वाय-७) केला असून त्याची वितरिका मायनर-३ कोरेगांव शहराच्या मध्य वस्तीतून गेली असून त्यावेळी या कामासाठी ज्या शेतकऱ्याच्या जमिनी अधिगृहीत करुन त्याचा मोबदला दिल्याचे गॅझेट व ॲवॉर्ड उपलब्ध आहेत मात्र कमी जास्त पत्रक बनवूनसुध्दा त्याची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी जास्त पत्रक बनवूनसूध्दा त्याची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर जमीन संपादनाचे गॅझेट व ॲवॉर्ड होऊन जमीन संपादन मूल्यांचे कमी-जास्त पत्रक तयार करुन संबंधित जुन्या शेतकऱ्यांच्या सर्वे नंबरच्या तत्कालीन हस्तलिखित ७/१२ उताऱ्यावर जलसंपदा विभागाच्या नोंदी झाल्या असून ७/१२ दस्तऐवज अद्ययावत करणेकामी तसेच सर्वे क्रमांकाऐवजी गट क्रमांक करताना सदर नोंदी जलसंपदा विभागाच्या नावाने अद्ययावत झालेल्या नसून त्यात त्रुटी असल्याने त्या दुरुस्त करण्याबाबत जलसंपदा विभागाकडून महसूल विभागास पत्रव्यवहार करण्यात आला असून त्यावर होणारी पुढील कार्यवाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कमी जास्त पत्रक त्वरित देण्याबाबत तसेच जलसंपदा विभागाकडून महसूल विभागास करण्यात आलेल्या पत्रव्यवहारावर प्रलंबित असलेली कार्यवाही तात्काळ करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) धोम पाटबंधारे उपविभाग कोरेगाव येथील १४ सर्व्हे नंबरपैकी १२ सर्व्हे नंबरवरील संपादीत क्षेत्र कमी करून कार्यकारी अभियंता धोम प्रकल्प या नावाने ७/१२ तयार करणेत आलेला आहे. उर्वरित २ सर्वे नंबर मध्ये संपादित केलेल्या जमिनीसह खाजगी जमीन देखिल शिल्लक असून दरम्यानच्या काळात पोट हिस्से पडल्याने मूळ संपादित क्षेत्र व शिल्लक खाजगी क्षेत्र याची खात्री करून संपादन यंत्रणेचे नाव अधिकार अभिलेखात दाखल करणेची कार्यवाही सुरु आहे.
(२) सदर संपादना संदर्भात सन १९८३ मध्ये कमी जास्त पत्रक तयार करण्यात आले असले तरी सदरचे कमी जास्त पत्रक जिल्हाधिकारी सातारा यांच्या कार्यालयास यापूर्वी प्राप्त झाले नसलेचे उपलब्ध कार्यालयीन अभिलेखाच्या तपासणीवरुन दिसून आले आहे. उपअधीक्षक भूमी अभिलेख कोरेगांव यांचेकडून दिनांक ०९/१२/२०२२ च्या पत्रान्वये कमी जास्त पत्रक प्राप्त करुन घेवून कार्यकारी अभियंता धोम पाटबंधारे यांचे नांव अधिकार अभिलेखात दाखल करणेत आले आहे.
(३) हे खरे नाही.

धोम पाटबंधारे प्रकल्पातील १४ पैकी १२ सर्वे क्र.मध्ये कमी जास्त पत्रक दुरूस्ती करण्यात आली आहे. उर्वरित २ सर्वे क्रमांकातील दुरूस्ती करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेतरस्त्यांची प्रकरणे मार्गी लावण्याबाबत

**(२१) * १६७७१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम १४३ अन्वये व मामलेदार कोर्ट अधिनियम, १९०६ कलम ५ अंतर्गत अनेक शेतरस्ता प्रकरणे विविध महसूल कार्यालयांत प्रलंबित आहेत, ही बाब खरी आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्तपैकी अनेक प्रकरणांत निकाल देण्यात आल्यानंतरही भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी न झाल्याने व पोलीस विभागामार्फत पोलीस बंदोबस्त न मिळाल्याने सदरील अर्धन्यायिक प्रकरणांची अंमलबजावणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गतिमान पध्दतीने शेतकऱ्यांना शेतरस्ता उपलब्ध करून देण्यासाठी शेतरस्ता मोजणी मोफत व अतितातडीने होणे तसेच पोलीस बंदोबस्त उपलब्ध होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नियम/अधिनियमात सुधारणा करुन शेतरस्त्यांची प्रकरणे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मामलेदार कोर्ट अधिनियम, १९०६ नुसार सुनावणीची संधी देवून अस्तित्वातील वहीवाटीचे रस्ते खुले करुन दिले जातात तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये शेतकऱ्यांना शेती वहीवाटीसाठी सरबांधावरुन शेत रस्ते उपलब्ध करुन दिले जातात. तथापि, असे करताना संबंधित विवादाबाबत शेतजमीनीची मोजणी करणे अनिवार्य असल्यास संबंधित शेतजमीन धारकांऱ्याकडून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ आणि त्याखालील नियमान्वये मोजणी फी भरुन घेण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील सारस्वत बँकेमार्फत हेल्थ केअर पॉलिसीद्वारे ग्राहकांची फसवणूक करण्यात येत असल्याबाबत

**(२२) * १६७९० श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील सारस्वत को.ऑप.बँकेत कर्ज घेण्यासाठी वा अन्य कारणास्तव येणाऱ्या नागरीकांशी संपर्क साधत पैसे गुंतवणूक करण्याची योजना दाखवून बँकेशी जोडलेल्या हेल्थ केअर (मेडीक्लेम) विमा पॉलिसी काढण्यास सांगण्यात येऊन ग्राहकांची फसवणूक करण्यात येत असल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण तालुक्यातील सारस्वत बँकेशी जोडलेल्या हेल्थ केअर पॉलिसीमध्ये म्हात्रे दवाखाना, परांजपे दवाखाना, सिध्दकला वनगे दवाखाना, सोहम दवाखाना आदि दवाखान्यांचे डॉक्टर्स औषधोपचार (ट्रीटमेंट) करीत असल्याचे सांगून बँक अधिकारी व हेल्थ केअर अधिकाऱ्यांनी पॉलिसी घेण्यास भाग पाडलेल्या रुग्णांना मेडीकेल्म मंजूर होत नसल्याने रुग्णांची अडवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमा पॉलिसी काढण्यास सांगून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) सारस्वत को-ऑप. बँक लि., मुंबई ही बहुराज्जीय बँक असून बँकेचे निबंधक हे केंद्रीय निबंधक, दिल्ली हे आहेत. बहुराज्जीय संस्थांबाबत लवाद नियुक्ती व्यतिरीक्त कोणतेही वैधानिक अधिकार राज्याच्या निबंधकास नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आंबा पिकविम्याची वाढलेली रक्कम कमी करण्याबाबत

**(२३) * १६४९५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबा पिकासाठीच्या विमा प्रीमियममध्ये झालेली वाढ कमी करावी अशी मागणी अध्यक्ष, महाराष्ट्र आंबा उत्पादक संघ यांनी मा.मंत्री, कृषि यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२०-२०२१ पर्यंत रायगड जिल्ह्यासाठी एका झाडासाठी रुपये ७०/- हप्ता म्हणजे हेक्टरी रुपये ७०००/- होता मात्र सन २०२१-२०२२ पासून त्यात चौपटहून अधिक वाढ करण्यात आली असून त्यानुसार एका झाडासाठी रुपये २८४/- म्हणजे हेक्टरी रुपये २९ हजार ४००/- इतका करण्यात आला आहे तसेच रत्नागिरी जिल्ह्यासाठी हेक्टरी रुपये १३ हजार ५००/- व सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रुपये १३ हजार ३००/- असा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यासाठी वाढलेला आंबा पीक विमा हप्ता कमी करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी आयुक्त, कृषि पुणे विभाग यांना दिलेल्या लेखी निवेदनानुसार कृषि आयुक्त, पुणे यांच्याबरोबर शेतकऱ्यांच्या झालेल्या बैठकीनंतरही पीक विमा हप्त्याची रक्कम कमी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील आंबा पीक विमा हप्त्याची रक्कम कमी करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे ही खरे आहे.

रायगड जिल्ह्यासाठी वाढलेला आंबा पीक विमा हप्ता कमी करण्याबाबत अध्यक्ष, महाराष्ट्र आंबा उत्पादक संघ व रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी यांचेसमवेत मा.आयुक्त, कृषि यांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी समक्ष चर्चा केली असून विमा हप्ता दर वाढीबाबत वस्तुस्थिती संबंधितांना अवगत केली आहे.
(४) केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार सन २०२० पासून कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासन कोरडवाहू जिल्ह्यांना ३० टक्के व बागायती जिल्ह्यांना २५ टक्केच्या मर्यादेत त्यांचा

समप्रमाणातील हिस्सा अदा करणार आहे. या योजनेतंर्गत अधिसुचित सर्व जिल्हे हे कोरडवाहू असल्याने राज्याला ३० टक्के मर्यादा लागू आहे. केंद्र शासनाने ज्याप्रमाणे विमा हप्ता रकमेतील महत्तम मर्यादा १२.५० टक्के निश्चित केली आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनानेही विमा हप्ता रकमेतील महत्तम मर्यादा निर्धारित करुन ३० ते ३५ टक्के पर्यंतचे अतिरिक्त ५ टक्के विमा दायित्व स्विकारुन ३५% च्या वरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी प्रत्येकी ५०:५० टक्के प्रमाणे भरावयाचा आहे. यापूर्वी सन २०२०-२१ पर्यंत विमा दरामध्ये शेतकऱ्यांना फळपिकनिहाय प्रति हेक्टरी विमा संरक्षित रक्कमेच्या ५ टक्के किंवा वास्तवदर्शी दर या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम विमा हप्ता म्हणून शेतकऱ्यांना भरावी लागत होती. सन २०२१-२२ मध्ये ३५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी विमा हप्ता दर प्राप्त झालेल्या फळपिकांसाठी शेतकऱ्यांनी भरावयाच्या विमा हप्ता दर ५ टक्के आहे. मात्र काही फळपिकांसाठी काही जिल्ह्यांमध्ये ३५ टक्के पेक्षा अधिक विमा हप्ता दर प्राप्त झाल्यामुळे शेतकऱ्यांनी भरावयाच्या विमा हप्ता दरामध्ये वाढ झालेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२४) * १५९०८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या वर्षाच्या खरीप हंगामाकरीता १ लाख ६३ हजार ३१८ हेक्टरसाठी पीक विमा भरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे पीकांचे नुकसान झाल्याने १ लाख ५७ हजार तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १ लाख ४२ हजार तक्रारी विमा कंपनीकडे वर्ग केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपनीकडे वर्ग करण्यात आलेल्या १ लाख ४२ हजार तक्रारींपैकी १ लाख २० हजार ८४९ तक्रारींची तपासणी झालेली आहे, तरीही गत तीन महिन्यांत शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून कोणतीही नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अतिवृष्टी व संततधारेमुळे पीक नुकसान झाले असेल व शेतकऱ्यांनी तक्रार नोंदवली नसेल तरीही संरक्षित किंमतीच्या २५ टक्के पीक नुकसान भरपाई देता येते या नियमान्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी १६ मंडळे जाहीर करुन कंपनीला नुकसान भरपाई देण्यासंदर्भात कळविले असतानांही विमा कंपनीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमा कंपनी विरोधात कारवाई करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्याने सोलापूर जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसान या दोन्ही बाबींअंतर्गत एकूण १.६३ लाख तक्रारी विमा कंपनीकडे प्राप्त झाल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

योजनेंतर्गत खरीप २०२२ मध्ये सोलापूर जिल्ह्यात हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या बाबी अंतर्गत सोयाबीन व भुईमूग या पिकाकरीता अनुक्रमे १२ व ६ महसूल मंडळ/ महसूल मंडळ गट अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. त्यापैकी भुईमूग पिकाकरीता ६४५ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ९.३६ लाख निश्चित करण्यात आली असून, त्यापैकी दिनांक १४/१२/२०२२ अखेर ४५४ शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ७.९९ लाख वाटप करण्यात आली असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तथापि, भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत सोयाबीन पिकाच्या अधिसूचनेवर आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

(५) योजनेंतर्गत खरीप २०२२ मध्ये सोलापूर जिल्ह्यात १.९८ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेऊन १.६३ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. त्यापैकी, दिनांक १४ डिसेंबर, २०२२ अखेर स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबींअंतर्गत एकूण १.२६ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रुपये ११६.७३ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी १.१ लाख शेतकरी अर्जदारांना रुपये १०४.१७ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपनीमार्फत करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई निश्चिती व वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पीक विम्याकरीता बीड पॅटर्न राबवून शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(२५) * १६०४० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत असून सदरहू योजना शेतकऱ्यांना अपेक्षित आहे तेवढी फायदेशीर न होता विमा कंपन्यांच्या फायद्याची असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना शेतकऱ्यांच्या हिताची नसल्याने, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी सन २०२२-२०२३ या कालावधीत कृषि विम्यासाठी बीड पॅटर्न राबविण्याची मागणी मा.पंतप्रधान महोदयांकडे केली असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड पॅटर्नमध्ये विमा कंपनीबरोबर करार करताना विमा कंपनीला नुकसान भरपाईपोटी गोळा केलेल्या रकमेच्या (प्रीमियम) ११० टक्क्यांच्या अधिक रक्कम द्यावी लागल्यास जास्तीची रक्कम शासनाकडून देय असेल असे स्पष्ट नमूद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विमा कंपनीला नुकसान भरपाईपोटी प्रीमियमच्या ८० टक्क्यांपेक्षा कमी रक्कम द्यावी लागणार असेल तर वीस टक्के नफा ठेवून उर्वरित साठ टक्के रक्कम शासनास द्यावी लागणार आहे. त्यामुळे विमा कंपन्यांचे नुकसानही होणार नाही व नफेखोरीलाही प्रतिबंध लागू शकतो, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात पीक विमाकरीता बीड पॅटर्न राबवून पीक विम्याचा मोबदला शेतकऱ्यांना तात्काळ मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

खरीप २०१६ ते रब्बी २०२१-२२ मध्ये ७१९.२८ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेवून ४११.६५ लाख हे.क्षेत्र विमा संरक्षित केले होते. त्यानुसार एकूण विमा हप्ता रक्कम रुपये २८३६८.७० कोटी निश्चित झाला असून दिनांक ०९/१२/२०२२ अखेर ३२४.८८ लाख शेतकरी अर्जदारांना अंतरीम नुकसान भरपाई रक्कम रुपये १९४३८.४९ कोटी निश्चित करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे आहे.

खरीप २०२२ व रब्बी २०२२-२३ हंगामासाठी राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना बीड पॅटर्न नुसार [Cup & Cap Model (८०:११०)] नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक (Area Approach) धरुन शासन निर्णय दिनांक ०१ जुलै, २०२२ अन्वये राबविण्यात येत आहे.
(५) योजनेंतर्गत खरीप २०२२ मध्ये दिनांक ०७/१२/२०२२ अखेर एकूण ५३.३० लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रुपये २३८४.९८ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली असून त्यापैकी ३९.८८ लाख शेतकऱ्यांना रुपये १८६८.६४ कोटी नुकसान भरपाईचे वाटप विमा कंपनीमार्फत करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई निश्चिती व वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील जंगली हत्तींच्या कळपांचा बंदोबस्त करण्याबाबत

**(२६) * १५१२३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लेकुरबोडी (जि.गडचिरोली) गावात जंगली हत्तींच्या कळपाने धुमाकुळ घातल्याने ८० वर्षीय वृध्द महिला गंभीर जखमी झाली असल्याची घटना दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जंगली हत्तीच्या कळपाने एका घरासह शेतातील उभ्या पिकांचे देखील नुकसान केले, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील जंगली हत्तींच्या कळपांचा बंदोबस्त करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे, सदर वृध्द महिलेला जंगली हत्तींच्या कळपाने जखमी केलेले नाही. वन्य हत्ती गावात आले होते तेव्हा घाईगडबडीने खाटेवरुन उठतांना सदर वृध्द महिला किरकोळ जखमी झाली होती. त्यानंतर सदर वृध्द महिलेस शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. सद्य:स्थितीत त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हत्तीच्या कळपाने केलेल्या शेतीचे व घरांचे नुकसानीचे मौका पंचनामे करुन प्रचलित शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अदा केली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील मानव – वन्य हत्ती संघर्ष कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबविल्या जात आहेत.

- वन्य हत्तींना प्रतिबंध करण्यासाठी वन कर्मचारी, हंगामी संरक्षण मजूरांचा समावेश करुन गस्ती पथक स्थापन केले आहे. सदर पथकामार्फत फटाके, मशाल इत्यादी वस्तूंचा वापर करुन वन्य हत्ती मानव वस्तीपासून दूर करण्याचे कार्य पथक करीत आहे. गावोगावी जाऊन गावकऱ्यांना वन्य हत्तींच्या हालचालीबाबत सूचीत करण्यात येते.
- वनकर्मचारी व संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत ग्रामसभेव्दारे हत्तींपासून शेतपीक नुकसानी, जीवीताचे संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात येते. वन विभागाच्या वाहनांवर ॲम्प्लीफायर लावून दररोज गावांमध्ये सकाळ-संध्याकाळ दवंडी देण्यात येते. वन्य हत्ती बाधित क्षेत्रात माहिती फलक लावण्यात येत आहेत.
- वन्य हत्ती या प्राण्याबाबत व वन्यप्राण्यांच्या सवयी, त्यांचे खाद्य, पाणी, भ्रमंती मार्ग ईत्यादीचा शास्त्रोक्त पध्दतीने अभ्यास करण्यासाठी वन कर्मचारी / अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- वन्य हत्ती प्रत्यक्षात गावात किंवा शेतात असतात तेव्हा त्यांना जंगलाच्या दिशेने मार्गस्थ करण्याकरीता अनुभवी १४ लोकांचा चमु (हुल्ला पार्टी) पश्चिम बंगाल राज्यातून बोलविण्यात आली आहे. सदर चमु प्रशिक्षित व अनुभवी असल्याने हत्तींच्या कळपाबरोबर राहून हत्तीपासून घर व शेतपीकाचे नुकसान कमी करणे, हत्तीच्या कळपाला गावात येण्यास अटकाव करणे याबाबत दिवसरात्र कार्य करीत आहे. तसेच त्यांचेकडून वनमजुरांना प्रशिक्षण देणे सुरू आहे.
- ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करुन वन्य हत्तीचा कळप कोणत्या ठिकाणी आहे व कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे याची स्थिती समजण्यासाठी थर्मल ड्रोनचा वापर प्रभावीरित्या करण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिकांना आगाऊ सूचना देऊन घर व शेतपीक नुकसानी कमी होण्यास मदत झाली आहे.
- जंगली हत्तींच्या उपद्रवामुळे शेतीचे व घराचे नुकसान झाले असल्यास झालेल्या नुकसानीची पंचनामे करण्यात आले असून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील उपविभागीय अधिकारी यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(२७) * १५१३६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील उपविभागीय अधिकारी यांच्याकडून बिगर शेती प्रकरण प्रलंबित ठेवणे व सदर प्रकरण मार्गी लावण्यासाठी पैशाची मागणी करणे, आर टी एस अपीलांचे निकाल प्रलंबित ठेवणे, सोलापूर-रत्नागिरी महामार्गामध्ये (हायवे) गेलेल्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी अडवणूक करणे, यांसारखे अनेक गैरव्यवहार होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्रकरण मार्गी लावण्यासाठी स्थानिक नागरिक उपविभागीय अधिकारी यांची भेट घेण्यासाठी गेले असता, सदर अधिकाऱ्यांमार्फत धमकीवजा अर्वाच्च भाषेत संवाद साधला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील उपविभागीय अधिकारी यांच्या गैरव्यवहारामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधी व विविध संघटनेचे पदाधिकारी तसेच एका राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे करूनही सदर अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरी आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांचेविरुध्द बिगर शेती प्रकरणे व आरटीएस अपिलांचे निकाल प्रलंबित ठेवणे, सोलापूर-रत्नागिरी महामार्गामध्ये (हायवे) गेलेल्या जमिनीचा मोबदला देण्यासाठी अडवणूक करणे इत्यादीबाबत दिनांक १२/०१/२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून सदर तक्रारीमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील कागल, गगनबावडा, गडहिंग्लज, आजरा, चंदगड तालुक्यांना कृषि विभागाच्या अहवालामुळे मदत मिळाली नसल्याबाबत

**(२८) * १६६८८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये परतीच्या पावसामुळे ३३% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या ५८६२ शेतकऱ्यांचे अंदाजे रुपये ३ कोटी ७६ लाखांचे नुकसान झाल्याचा अहवाल कृषि विभागाने शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल, गगनबावडा, गडहिंग्लज, आजरा, चंदगड या पाच तालुक्यांना नुकसान भरपाई मिळणे आवश्यक होते परंतु, शासनाच्या निकषानुसार कृषि विभागाने दिलेल्या अहवालामुळे ह्या पाच तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील उक्त तालुक्यांसह नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये परतीच्या पावसामुळे ५९३९ शेतकऱ्यांचे कोल्हापूर जिल्ह्यात शेती/फळपिकाखालील एकूण १९३७.१९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्य शासनाने अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीकरीता २४ तासात ६५ मी.मी पेक्षा जास्त पाऊस हा निकष विहित केला आहे. या निकषात बसणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानाकरीता विहित दराने मदत दिली जाते. माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात २४ तासात ६५ मी.मी पेक्षा जास्त पाऊसामुळे झालेल्या नुकसानीकरीता निधी मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून लवकरच निधी वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात येईल. तसेच ऑक्टोबर,२०२२ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये निकषाबाहेरील पावसामुळे झालेल्या शेतीपिकांचे नुकसानाकरीता मदत देण्यासाठी निकष निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मच्छिमार बांधवांच्या १२० अश्वशक्ती इंजिनावरील मासेमारीच्या नौकांना डिझेल कोट्यातून वगळण्यात आल्याबाबत

**(२९) * १५५६६ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मच्छिमार बांधवांच्या १२० अश्वशक्ती इंजिनावरील मासेमारी नौकांना डिझेल कोट्यातून वगळण्यात आले असून मुंबई, मुंबई उपनगरासह ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यातील १२० अश्वशक्ती पेक्षा अधिक अश्वशक्ती असणाऱ्या ७००० मासेमारी नौकांवर निर्बंध लादण्यात आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, मत्स्यविकास विभागाच्या दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ ते २२ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीमध्ये ठाणे/पालघर येथील लेखा परिक्षणादरम्यान महालेखाकार कार्यालयाने डिझेल तेलावरील विक्रीवरची प्रतिपूर्ती या योजनेबाबत १२० अश्वशक्तीवरील सहा सिलेंडर क्षमतेच्या लोकांना करमुक्त डिझेल कोटा व कर परताव्याबाबत लेखाआक्षेप उपस्थित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १२० अश्वशक्तीवरील इंजिन क्षमता असणाऱ्या नौकांना डिझेल कोटा व प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबत शासन निर्णयात सुधारणा करण्याचा व त्याबाबत शुद्धिपत्रक निर्गमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मासेमारी नौकांना डिझेल कोट्यातून वगळण्याचा निर्णय तात्काळ रद्द करून डिझेल कोटा पूर्ववत सुरू करण्याची मागणी अनेक मासेमार संस्थानी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने डिझेल कोटा पूर्ववत सुरू करुन, डिझेल परतावा अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

शासन पत्र दिनांक १६/०२/२०२२ अन्वये १२० अश्वशक्ती इंजिनवरील मासेमारी नौकांना डिझेल कोटयातून वगळण्यात आलेले होते. परंतु इतर कोणत्याही प्रकारचे निर्बंध लादण्यात आलेले नाहीत.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) शासन शुध्दीपत्रक दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ अन्वये १२० अश्वशक्ती पेक्षा जास्त इंजिन क्षमता असलेल्या नौकांना डिझेल कोटा पुर्ववत करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नाट्यगृहांचे नवीन तंत्रज्ञानासह आधुनिकीकरण करण्याबाबत

**(३०) * १५५१५ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारित ५१ आणि राज्य शासनाची ४ नाट्यगृहे अशी एकूण ५५ नाट्यगृहे असून यातील बहुतांश नाट्यगृहांची दुरवस्था झाली असल्याची बाब दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नाट्यगृहांचे नवीन तंत्रज्ञानासह आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त नाट्यगृहांचे नवीन तंत्रज्ञानासह आधुनिकीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्याकडे नाट्यगृहाच्या दुरावस्थेबाबत दिनांक २८/०९/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत नाट्यगृहाची दुरुस्ती व नियमित देखभाल नगरविकास विभागांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाची असल्याने अशा नाट्यगृहांना जिल्हा नियोजन समितीच्या/ आमदार निधी /CSR निधीतून निधी उपलब्ध करुन देऊन सदर नाट्यगृह सुव्यवस्थेत करण्यात यावे असे निदेश नगरविकास विभागास दिले आहेत. राज्य शासनाच्या अखत्यारितील रविंद्र नाट्य मंदिर नाट्यगृहाचे नवीन तंत्रज्ञानासह आधुनिकीकरण करण्याची बाब विचाराधीन आहे. तसेच नवीन नाट्यगृह बांधतांना रंगकर्मींच्या गरजा विचारात घेऊन नवीन टाईप आराखडा करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात वन्य प्राण्यांनी केलेल्या मनुष्यहानी व पीक नुकसानीबाबत

**(३१) * १५६४२ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाघाने धुमाकूळ घातला असून गडचिरोली जिल्ह्यातील १३ तर चंद्रपूर जिल्ह्यातील १० नागरीक मृत्यूमुखी पडल्याचे तसेच चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे धान, सोयाबीन, ऊस या पिकांचे रानडुकराकडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचेही दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात होणाऱ्या शेतपिकांचे नुकसान टाळण्यासाठी सौरऊर्जेवर चालणारे करंट यंत्र अनुदानावर उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.वने मंत्री यांना दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन्यजीवांचे मनुष्यवस्तीवरील वाढते हल्ले रोखण्याबाबत, मृत कूटूंबाच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच पिकांची हानी टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) सन २०२२ मध्ये माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर पर्यंत वाघाच्या हल्ल्यात मनुष्य हानीच्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये ३८ तर गडचिरोली जिल्ह्यामध्ये २२ घटना झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच रानडुक्करामुळे शेतपीक हानीच्या गडचिरोली जिल्ह्यात ३८६, चंद्रपूर जिल्ह्यात ८६१३ व वर्धा जिल्ह्यात १०२९ घटना झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या शेतपिकाचे नुकसान टाळण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास या योजनेंतर्गत सौर ऊर्जा कुंपणाकरीता अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २५/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये तरतूद करण्यात आली आहे.

(३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या कायदेशीर वारसास सद्य:स्थितीत रुपये २०.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात येते.

मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी व शेतपीक नुकसान टाळण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :

- उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना वनातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव / खोदतळे, कृत्रिम पाणवठे (सिमेंट टाके बांधणे) ईत्यादी कामे करण्यात येतात. तसेच बारमाही व हंगामी पाणस्थळावर नियतमितपणे गस्त वाढवून त्यामध्ये सुध्दा जास्त काळ पाणी उपलब्ध राहील याची काळजी घेण्यात येते.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्राण्यांना वनातच गवत/ चारा उपलब्ध होण्यासाठी कुरण रोपवन घेण्यात येतात.
- संवेदनशिल क्षेत्रात स्थनिकांच्या सहभागाने मानव-वन्यजीव संघर्षाच्या स्थितीत तात्काळ कार्यवाही करण्यासठी Primary Response Team गठीत करण्यात आल्या आहेत.

- कॅमेरा ट्रॅप लावून वन्यप्राण्यांच्या हालचालीवर सनियंत्रण ठेवण्यात येते.
- ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे, उपजिविकेसाठी साधन मिळावे यासाठी संरक्षित क्षेत्रात व त्या लगतच्या क्षेत्रात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येते. त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, र्निधुर चुली, सोलर दिवे, चेनलिंक फेन्सिंग इत्यादी उपक्रम राबविले जातात.
- वाघ/बिबट/हिंस्त्र वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या परिसरात गस्त वाढविण्यात येऊन वनविभागाच्या गाड्या पहाटे अशा क्षेत्रात फिरतील अशा रितीने नियोजन करण्यात येते.
- गावातील कचऱ्याची/शिळे अन्न/मांस इ.ची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत स्थानिकांना सूचना देणे, जेणेकरून वन्यप्राणी गावात शिरकाव करणार नाही, यासाठी जनजागृती करण्यात येते.
- परिस्थितीकीय विकास समितीचे सदस्य, पदाधिकारी व इतर ग्राम सदस्य यांची सभा घेवून वन्यजीव संघर्ष टाळण्याकरीता जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाद्वारे बियाणे खरेदी करताना झालेली अनियमितता

**(३२) * १५३२६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART) हा जागतिक बँक अर्थ सहायित प्रकल्प असून शेतकरी यांना देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देणे, यासाठी त्यांना लागणारे आवश्यक तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा यासाठी अर्थसहाय्य या प्रकल्पांतर्गत दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पासाठी बियाणे पुरवठा करताना कापूस पिकाच्या पेरणीनंतरही शेतकऱ्यांसाठी या प्रकल्पाच्या निधीतून आवश्यकता नसताना बियाणे खरेदी केल्याची बाब दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पांतर्गत कापूस पिकाच्या पेरणीनंतरही शेतकऱ्यांना वाटप केलेले बियाणे कोणामार्फत व किती निधी वापरुन खरेदी केले आहेत, याबाबतचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बियाणे पुरवठा करताना झालेल्या अनियमितेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आवश्यकता नसताना बियाणे खरेदी केली, अशी बाब नाही. स्मार्ट कॉटन मूल्यसाखळी विकास उपप्रकल्पातील प्रात्यक्षिकांकरीता कापूस बियाणे आवश्यक होते. तथापि, बियाणांचा पुरवठा विलंबाने झाला आहे.

(३) प्रकल्प संचालक आत्मा, अकोला यांच्यामार्फत मे. वऱ्हाड ग्रेन्स ॲग्रीकल्चर प्रोड्यूसर कं. लि., आगर यांना यांच्यामार्फत पुरवठा झालेला असून त्याची किंमत रुपये १०,६९,२००/- इतकी असून सदर देयक अदा करण्यात आलेले नाही.
(४) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली असून, सदर चौकशी समितीच्या अहवालातील शिफारशी नुसार संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्याची सेवा खंडीत करण्यात आलेली आहे. तर तत्कालिन प्रकल्प संचालक, आत्मा, अकोला यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्याची चौकशी समितीने शिफारस केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील बनावट कृषि निविष्ठा विक्री प्रकरणाबाबत

**(३३) * १५९७३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील बनावट कृषि निविष्ठा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबतची मागणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२२ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित बनावट कृषि निविष्ठा विक्री प्रकरणी मानवत (जि.परभणी) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व बनावट कृषि निविष्ठा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी मानवत पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ०२४४/२०२२ दिनांक ११/०८/२०२२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(३) मानवत पोलीस स्टेशन येथे Bio-R-३०३ चे १२० लिटर व धानुका ॲग्रोटेक कंपनीचा इमामेक्टीन बेंझोईट २५० ग्रॅम वजनाच्या १६ बॉटल एकूण रुपये ४,६५,३७६/- रक्कमेचा माल जप्त केला आहे. आतापर्यंत १२ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून रुपये १७.३९ लाखाच्या बनावट औषधांचा पेटया जप्त करण्यात आल्या आहेत. संबंधित आरोपींवर आरोपपत्र दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. तसेच, सदर प्रकरणी प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील मे. माऊली ॲग्रो एजन्सी, मानवत यांचा किटकनाशक परवाना निलंबित करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कलंबिस्त (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावात काळा दगड खाण स्टोन क्रशर प्रकल्पाला परवानगी नाकारण्यासाठी ग्रामस्थांनी केलेल्या मागणीबाबत

**(३४) * १६२८४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कलंबिस्त (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावात काळा दगडखाण स्टोन क्रशर उत्खनन प्रकल्पाला शासन स्तरावर ना-हरकत दाखला देऊ नये अशा मागणीचे निवेदन गावातील देवस्थान गावकर, दवेकर मंडळी व सर्व ग्रामस्थांच्यावतीने शिष्टमंडळाने तहसिलदार, सावंतवाडी यांची भेट घेऊन माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कलंबिस्त गावातील गट क्र. १२८८ ही जमीन खरेदी करण्यात आली असून सदर जमिनीत दगडखाण स्टोन क्रशर रस्त्यावर अधारित उद्योगांना ग्रामपंचायतीकडे ना-हरकत दाखला मिळण्याबाबत दिनांक ५ सप्टेंबर, २०२२ रोजी संबंधितांनी अर्ज दाखल केला असता, ग्रामसभेत या दगडखाण कामाला ना-हरकत देऊ नये व यापुढे मार्ग दाखला मागणीचा अर्जसुध्दा स्वीकारू नये असे ग्रामसभेत सर्वानुमते ठरवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कलंबिस्त (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गाव निसर्गरम्य असून येथे शेती, बागायतीवर आधारित उपजिविका, सहयाद्री पट्टा, दगडखाणीच्या पर्वतरांगा असून या भागातील दगड व निसर्ग संपत्ती गावाच्या विकासाला आणि पर्यावरणाला पोषक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या भागातील डोंगर व दगड यांचे उत्खनन केल्यास गावच्या वस्तीला हानी पोहचून शेती बागायती, पूरक व्यवसाय, पशुसंवर्धन, जनावरे, गुरेढोरे तसेच पिण्याच्या पाण्यावरही त्याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कलंबिस्त (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावात ग्रामस्थांनी केलेल्या काळा दगडखाण स्टोन क्रशर प्रकल्पाला परवानगी नाकारण्याच्या मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) कलंबिस्त (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामस्थांचे मौजा कलंबिस्त येथे काळा दगड या गौणखनिज उत्खननात परवानगी देऊ नये असे या विषयाचे निवेदन तहसिलदार, सावंतवाडी यांना प्राप्त झाले आहे. तसेच दिनांक १२/०९/२०२२ रोजी झालेल्या ग्रामपंचायत कलंबिस्तच्या ग्रामसभेत दगडखाण कामाला परवानगी देण्यात येवू नये व या पुढेही दगडखाण मागणीचा अर्ज स्विकारू नये असा ठराव ग्रामसभेत ठरविण्यात आला.

सदर गावामध्ये गौणखनिज उत्खननासाठी खाणपट्टा मिळणेस्तव अथवा अल्प मुदतीचा परवाना मिळणेस्तव कोणताही अर्ज/प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तसेच सद्य:स्थितीत मौजा कलंबिस्त मध्ये कोणतेही गौणखनिज उत्खनन करण्यासाठी व क्रशरसाठी परवानगी देण्यात आलेली नाही.

----------------

## सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे काम सुरु करण्याबाबत

**(३५) * १६१६७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत नाशिक विभागात जळगाव आणि अमरावती विभागात अकोला येथे प्रत्येकी एक याप्रमाणे दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा तत्कालीन मा.मंत्री, वित्त यांनी सन २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील ग.नं. ३३, ३५,५५,५६, व ५९ अशी एकूण ३३.७१ हे.आर. एवढी जमीन सदर महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना उपलब्ध करुन दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सालबर्डी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव,) येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी मौजे. सालबर्डी, ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव येथील ३३.७१ हे. आर. जमीन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीची अधिस्वीकृती कायम राखणेबाबत

**(३६) * १५३१८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीची भारतीय कृषि संशोधन परिषदेची अधिस्वीकृती सन २०२३ पर्यंत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुढे अधिस्वीकृती कायम राखण्यासाठी व विद्यापीठाचे नामांकन सुधारणासाठी ५४ टक्के रिक्त असलेली शिक्षक व शिक्षकेतरांची पदे तात्काळ भरणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यापीठाचे नामांकन सुधारण्यासाठी प्रयोगशाळा, शैक्षणिक सुविधांचे बळकटीकरण करणे, शेतकरीभिमुख प्रकल्पाचा विस्तार करणे, अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीची अधिस्वीकृती कायम राखण्यासह नामांकन सुधारण्यासाठी तसेच शिक्षक व शिक्षकेतरांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत असलेली रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत शैक्षणिक सुविधा, प्रयोगशाळा बळकटीकरण, अत्यावश्यक सोयी-सुविधा तसेच शेतकरीभिमुख प्रकल्प राबविण्याकरीता राज्य शासनाकडून कृषि विषयक संशोधन व शिक्षण या मुख्य लेखाशिर्षाअंतर्गत विविध लेखा शिर्षाखालील उद्दिष्टांकरीता परभणी कृषि विद्यापीठास सहायक अनुदान वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद पंचायत समिती अंतर्गत ता.जि.उस्मानाबाद येथील शोषखड्डयांच्या कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३७) * १६५१६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद पंचायत समिती अंतर्गत मौजे खेड, बेंबळी, मेडसिंगा, ढोकी व उपळा (जि.उस्मानाबाद) येथील शोषखड्डयांच्या कामामध्ये रुपये १,१२,२८,९३६/- इतका गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तत्कालीन गट विकास अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी व कंत्राटी कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित केली असूनही इतर जबाबदार अधिकाऱ्यांशी संगनमत करुन केवळ कंत्राटी कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुपये १,१२,२८,९३६/- इतक्या रकमेच्या गैरव्यवहार प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर भा.दं.वि.नुसार कारवाई व वसुलीसाठी कारवाई न करता विभागीय आयुक्तांनी जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, दैनिक समय सारथी या लोकप्रिय वर्तमानपत्रानेही या प्रकरणाची लाचलुचपतसह आयकर विभागाकडून चौकशीची मागणी दिनांक १३ नोहेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याबाबत तसेच गैरव्यवहार केलेली रक्कम जमीन महसुलाप्रमाणे वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी तत्कालीन गटविकास अधिकारी, सहायक लेखाधिकारी व दोन ग्रामसेवक यांना निलंबीत करण्यात आले आहे सदर अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत असून, वसूलपात्र रकमेची वसुलीची कार्यवाही देखील सुरु आहे व जबाबदार चार कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येत आहे. वसुलपात्र रकमेची वसुली देखील करण्यात येत आहे. सदर अपचाऱ्यांकडून आतापर्यंत एकूण वसूलपात्र रकमेपैकी रुपये ७५,७०,०००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले रायगडावरील समाधीचे पावित्र्य जपण्याबाबत

**(३८) * १६६३२ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले रायगडावरील समाधीचे पावित्र्य जपण्यात केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आक्षेप इतिहास संशोधक व शिवप्रेमींनी नोंदविला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायंकाळी सहा नंतर गडावर थांबण्यास बंदी आणि ऐतिहासिक ओवरीवर श्वानाच्या पुतळयाच्या संरक्षणासाठी पोलिसांचे चौकी स्थळ बनवल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले रायगडावरील समाधीचे पावित्र्य जपण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी दिनांक १७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले रायगडावरील समाधीचे पावित्र्य जपण्याबाबत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांना विनंती केली आहे.

(२) होय.

याबाबत स्थानिक प्रशासन, संभाजी ब्रिगेड व शिवप्रेमी संस्था यांच्याकडून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांना पत्रव्यवहार प्राप्त झालेले आहे.

(३) भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई या कार्यालयाने दिनांक २७/१०/२०२२ रोजी पोलीस अधीक्षक, रायगड यांच्यासोबत किल्ल्याचा सुरक्षेचा आढावा घेतला आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीच्या देखरेखीसाठी १६ पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भारतीय पुरातत्व सर्वेक्षण,

मुंबई या कार्यालयाने भविष्यात अनुचित घटना टाळण्यासाठी समाधी परिसराजवळ सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविले आहेत. याशिवाय रायगड किल्ल्यावर अतिरिक्त खाजगी सुरक्षा रक्षकांची मागणी केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गोसेवा आयोग स्थापन करण्याबाबत

**(३९) * १६७७२ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र दोन प्राधिकरण असून महाराष्ट्र गोवंश रक्षण प्राधिकरण/गोसेवा आयोग स्थापन करण्यासाठी सन १९९८ मध्ये तत्कालीन मंत्री, पशुसंवर्धन यांनी विधेयक मांडले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विधेयक संमत होऊन महाराष्ट्र गोवंश रक्षण प्राधिकरण/ गोसेवा आयोग स्थापन करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आदि राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्र गोसेवा आयोग स्थापन करण्यासाठी गोशाला महासंघाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोसेवा आयोग स्थापन करून त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.
(२) नाही.
(३) होय.
(४) राज्यात गोसेवा आयोग स्थापन करण्यासाठी पुढील योग्य ती कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणेबाबत

**(४०) * १५८७७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२७९७ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिनांक १ एप्रिल, २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंतच्या थकीत कर्जदार शेतकऱ्यांना रुपये २ लाखापर्यंत पीक कर्ज माफ करण्याचा निर्णय महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत बहुतांश शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतची कर्जमाफी मिळाली असून अद्यापही राज्यातील ९९ हजार शेतकऱ्यांची ४०० कोटींची कर्जमाफी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत कर्जमाफीसाठी ९९ हजार शेतकऱ्यांपैकी ४५ हजार शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाचे प्रमाणिकरण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील संबंधित ९९ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यासंदर्भात तसेच त्यांचे आधार क्रमांकाचे प्रमाणिकरण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत ८२,२६६ कर्जखात्यांना लाभ देणे प्रलंबित असून यापैकी ४५,९७१ कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण न झाल्याने सदर कर्जखातेदारांना कर्जमाफीचा लाभ देता आला नाही.

(४) सदर योजनेंतर्गत कर्जमाफीचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच आधार प्रमाणिकरण प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांना दुरध्वनीद्वारे, लघुसंदेशाद्वारे तसेच स्थानिक दैनिकामधून आवाहन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना पीक विमा देण्यास विलंब होत असल्याबाबत

**(४१) * १६५२६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५.३८ लाख अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांनी पीक विमा मिळण्याबाबत केलेले दावे विमा कंपनीकडून नाकारण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी पीकांच्या संरक्षणासाठी पीक विमा कंपन्यांकडून काढलेल्या विम्याद्वारे पीक विमा कंपन्यांना वर्षभरात रुपये पाच हजार कोटींचा नफा झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नियुक्त केलेल्या कंपन्यांपैकी एचडीएफसी इर्गो इन्शुरन्स कंपनीला रुपये ४९७, ईफ्को-टोकिओ इन्शुरन्स कंपनीला रुपये ७७८, भारती ॲक्सा इन्शुरन्स कंपनीला रुपये ५०७, बजाज अलायन्झ इन्शुरन्स कंपनीला रुपये ५८१, रिलायन्स इन्शुरन्स कंपनीला रुपये ९२०, भारतीय कृषि विमा कंपनीला रुपये १६९२ कोटयवधीचा नफा वर्षभरात झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पीक विमा कंपन्यांविरुध्द सांगोल्याच्या शेतकऱ्यांनी मा.उच्च न्यायालयात खटला दाखल केला असून पीक विमा कंपन्यांना दिलेल्या नोटीसीबाबत कंपन्यांनी कोणतीही माहिती सादर केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक नुकसानीबाबत सूचना देवूनही शेतकऱ्यांना पीक विमा नाकारणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२१ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत एकूण ४२.१२ लाख सूचना प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त सर्व सूचनांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून प्राप्त सूचनांपैकी दिनांक ०७/१२/२०२२ अखेर ३८.१३ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये २३७५.६३ कोटी निश्चित करण्यात आले असून त्यापैकी ३६.२५ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये २३६८.०७ कोटी वाटप करण्यात आले आहेत. उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल व्यवस्थापनावर कारवाई करणेबाबत

**(४२) * १५०९३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी मद्यविक्रीस मनाई असून तो दिवस कोरडा दिवस (dry day) म्हणून पाळण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधेरी (मुंबई) येथील 'सहारा स्टार' या पंचतारांकित हॉटेलमधील मेन्शन क्लबमध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी मद्यविक्री सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू हॉटेलने समाजमाध्यमांवर (सोशल मिडीया) जाहीरपणे NODRYDAY अशी जाहिरात देखील प्रसिध्द केली होती, तसेच ग्राहकांना दुसऱ्या दिवसाचा दिनांक आणि चुकीचा जीएसटी क्रमांक टाकून देयके दिल्याचे देखील समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित हॉटेल व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. तथापि, सहारा स्टार ही पंचतारांकित हॉटेल आस्थापना असून महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, विक्रीच्या नोंदवह्या, इ.) नियम १९६९ मधील नियम १०(१) मधील दुसऱ्या परंतुकानुसार तीन तारांकित दर्जा व त्यावरील तारांकित दर्जा असलेल्या हॉटेल आस्थापनेस निवडणुकीचे दिवस व मतमोजणीचे दिवस वगळता इतर कोरडे दिवस (Dry day) लागू नाहीत.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी वृत्तमान पत्रातील बातमीच्या अनुषंगाने विसंगतीबाबत सदर अनुज्ञप्तीचे दिनांक ०३/१०/२०२२ रोजी निरीक्षण करुन नियमभंगाचे प्रकरण नोंदविले असून संबंधित अनुज्ञप्तीधारकास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोजेगाव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथे गॅबियन बंधाऱ्याच्या कामात गैरव्यवहार केल्याबाबत

**(४३) * १६०३६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोजेगाव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत गॅबियन बंधाऱ्याच्या कामासाठी हजेरी पत्रक काढून कोणतेही काम न करता संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोजगाव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या सिंचन विहिरीसाठी नमुना नं. ४ द्वारे मजुरांची मागणी नसताना, औंढा नागनाथ पंचायत समिती सहायक लोक अभियोजक (एपीओ), डाटा एंट्री ऑपरेटर व संबंधित कर्मचारी यांनी गॅबियन बंधाऱ्याच्या कामासाठी परस्पर पाचशे मजुरांचे हजेरीपत्रक निर्गमित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून शिस्तभंगविषयक कारवाई सुरु आहे. याशिवाय संबंधित दोषी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यामध्ये हळद उपकेंद्र स्थापन करण्याबाबत

**(४४) * १६७०४ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील हळदीची सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून हिंगोलीची ओळख असल्यामुळे हिंगोली जिल्ह्यात हळद संशोधन केंद्र (Turmeric Research Centre) उभारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात हिंगोली जिल्ह्याच्या धर्तीवर हळद उपकेंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी तेथील हळद उत्पादक शेतकरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे भाजीपाला शास्त्र विभाग प्रमुख तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरण ठरविण्यासाठी शासनाच्या अभ्यास समितीची माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बैठक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यात हळद उपकेंद्र झाल्यास विदर्भातील हळद उत्पादकांना तांत्रिक पध्दतीने उत्पादन वाढविण्यास मदत होण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, अकोला जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतकरी व स्थानिक प्रतिनिधी यांनी वर्तमानपत्रातून मागणी केली आहे.
(३) हे खरे नाही.

तथापि, दिनांक २६/०२/२०२१, दिनांक ३१/०५/२०२१, दिनांक १४/०९/२०२१, दिनांक १२/१०/२०२१, दिनांक ०४/१२/२०२१ व दिनांक ०९/०३/२०२२ रोजी हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरण अभ्यास समितीच्या बैठका झाल्या आहेत.
(४) अकोला जिल्ह्यामध्ये हळद पिकाखाली २८६ हे. क्षेत्र आहे. जिल्ह्यात हळद मसाला पिकाच्या लागवडीसाठी हळद बेणे प्रामुख्याने डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व कृषि विज्ञान केंद्र, सिसा उदेगांव, ता.जि.अकोला यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात येते. अकोला जिल्ह्यातील हळद पिकाखालील क्षेत्र विचारात घेता हिंगोली जिल्ह्यातील मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राद्वारे विदर्भातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे शक्य आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथे अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(४५) * १५९५८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वझूर, शेवडी जहाँगीर, राव राजूर, मैराळ सावंगी, गौंडगाव, महातपूरी, डाकू पिंप्री, जोड परळी, वाघ पिंप्री, काजळी रोहीना, राव राजूर (जि.परभणी) व इतर अनेक रेती लिलाव धारकाने परवानगीच्या चौपट वाळू अवैधरित्या उपसा करून विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध वाळू उपसा संदर्भात जिल्हाधिकारी, परभणी यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे, २०२२ रोजी मा.मुख्य सचिव यांना ई-मेलव्दारे केलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व रेती धक्क्यांवरील अवैधरित्या होणारी वाळू चोरी व उपसा या संबंधित कंत्राटदार, तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार, उपजिल्हाधिकारी यांच्या संगनमताने करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व रेती धक्क्यांची पावसाळयापूर्वी ड्रोन कॅमेऱ्याव्दारे पाहणी, ईटीएस मशीनव्दारे मोजणी व तपासणी करण्याची मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२२ मध्ये मा.प्रधान सचिव, पर्यावरण यांच्याकडे लेखी निवेनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अवैध रेती उत्खनन करणाऱ्या संबंधित दोषींना रुपये १ कोटी २८ लाख ३४ हजार २३२ तसेच नियमबाहय वाहतूक करणाऱ्या वाहन धारकांना रुपये २१ लक्ष ६७ हजार ७०० इतक्या रक्कमेच्या दंडाची नोटीस जारी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४), (५) व (६) वझूर, शेवडी जहाँगीर, राव राजूर, मैराळ सावंगी, गौंडगाव, महातपूरी, जोड परळी, वाघ पिंप्री, काजळी रोहीना, राव राजूर (जि.परभणी) च्या ठिकाणी रेती लिलाव धारकाने परवानगीच्या चौपट वाळू अवैधरित्या उपसा करून विक्री केल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, मौजे डाकुपिंप्री ता.पाथरी, वाळुघाटाची ड्रोन कॅमेराव्दारे मोजणी करण्यात येवून त्यामध्ये लिलावधारकाने ३०७९.२१५ ब्रास उत्खनन केल्याचे आढळून आले आहे व ईटीपी रिपोर्ट नुसार २३२९ ब्रास रेतीचे वाहतूक झाल्याचे आढळून आले. तसेच मंडळ अधिकारी बाभळगाव यांच्या अहवालानुसार ३० ब्रास रेतीचा डेपोवर साठा असल्याचा अहवाल सादर केला आहे. त्यानुसार ड्रोन कॅमेराद्वारे केलेली मोजणी, ऑनलाईन उचल व रेती डेपोवरील साठा यांचा ताळमेळ केला असता लिलाव धारकाने ७२०.२१५ ब्रासची विना ईटीपी वाहतूक केली असल्याचे आढळून येत असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, पाथरी यांनी १,२८,३४,२३१/- (अक्षरी एक कोटी अठ्ठावीस लाख चौतीस हजार दोनशे एकतीस) रुपयाचे दंडाचे आदेश पारित केले आहेत. तसेच, उपविभागीय अधिकारी, पाथरी व तहसिलदार, पाथरी यांनी वाहतूक पासच्या तपासणीच्या वेळी ८ वाहने वाहतूक पास शिवाय वाहतूक करत असताना आढळून आल्याने संबंधित वाहन धारकांवर रुपये २१,६७,७००/- इतक्या रकमेचे दंडाचे आदेश पारित करण्यात आलेले आहे.

-----------------

## केळशी उंबरशेत (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(४६) * १६२९० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळशी उंबरशेत (ता.दापोली जि.रत्नागिरी) येथील भारजा नदीवर सक्शनपंपाद्वारे विनापरवाना मागील १ वर्षापासून वाळू उपसा सुरू असून दररोज सुमारे ४ ते ८ ब्रासचे अत्याधुनिक डंपरने बेकायदेशीर वाळूची वाहतूक होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वाळू उपसा व वाहतूकीमुळे मच्छिमार समाजाचे नुकसान होत असून गावातील रस्तेही खराब झाल्यामुळे गावातील ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अवैध वाळू उपसा व वाहतूकीबाबत ग्रामस्थांनी तहसिलदार, दापोली व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे मागील ६ महिन्यांपासून लेखी तक्रारी करूनही याप्रकरणी स्थानिक महसूल प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नसल्याने वाळू माफिया बेकायदेशीर वाळू उपसा करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भारजा नदीवर अवैध वाळू उपसा करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) दापोली तालुक्यातील मौजे उंबरशेत ग्रामपंचायत हद्दीत भारजा नदीमध्ये सक्शन पंपाद्वारे वाळू उपसा होत असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, दापोली यांच्या तपासणी पथकामार्फत अचानक तपासणी केली असता त्याठिकाणी विनापरवाना वाळू उत्खनन, वाहतूक किंवा अनधिकृत वाळू साठा व वाळू उत्खननाची साधने आढळून आली नाही.

दिनांक ०५/१२/२०२२ रोजी तहसिलदार, दापोली यांच्या पथकामार्फत तपासणी केली असता ०.७५ ब्रास वाळू साठा जप्त करुन संबंधीतावर दापोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच दापोली तालुक्यात एकूण २१ प्रकरणांमध्ये रुपये २९,९५,०००/- इतका दंड करण्यात आला असून ५ फौजदारी स्वरुपाच्या कारवाया करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या आदेशान्वये तालुका पातळीवर भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून विनापरवाना वाळू उत्खनन व वाहतूक होऊ नये याची वेळोवेळी तपासणी करण्यात येते, तसेच महत्वाच्या ठिकाणी चेक पोस्ट देखील बसविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील रंगकर्मी कलाकारांची शासन स्तरावर नोंद करण्याबाबत

**(४७) * १६७९६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील रंगकर्मी हे असंघटित असून माथाडी कामगारांच्या धर्तीवर रंगकर्मी बोर्डाची स्थापना करावी, कलाकार पेन्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी असलेल्या अटींमध्ये शिथिलता आणावी तसेच मानधनाच्या रकमेत वाढ करावी, अशा अनेक मागण्यांसाठी महाराष्ट्रातील रंगकर्मींनी निदर्शने केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, "रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्र" यांच्या वतीने श्री.विजय पाटकर, अभिनेते यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने तत्कालीन मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांची उक्त मागण्यांसंदर्भात भेट घेतली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई वा इतर ठिकाणी कला सादर करणाऱ्या रंगकर्मींना भाडेतत्त्वावर देणाऱ्या निवासी गाळयांमध्ये प्राधान्याने व सवलतीच्या दरात सोय करणे तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी रंगकर्मींसाठी विश्रामगृहे बांधण्याबाबत उक्त बैठकीत आश्वासित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कानाकोपऱ्यात विखुरलेल्या रंगकर्मींची शासन दरबारी नोंद होण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने नोंदी करण्याचे तत्कालीन मा.सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी आदेशित करुनही शासन स्तरावर नोंद घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रंगकर्मी बोर्डाची स्थापना करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

रंगकर्मी आंदोलन, महाराष्ट्र यांनी तत्कालीन मंत्री, सांस्कृतिक कार्य यांना सादर केलेल्या निवेदनामध्ये मुंबईत कला सादर करण्यासाठी येणाऱ्या कलाकारांना भाडेतत्वावर देण्यासाठी शासनातर्फे बांधण्यात येणाऱ्या निवासी गाळयांमध्ये प्राधान्याने व सवलतीच्या दरात सोय करण्यात यावी. तसेच प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी रंगकर्मींसाठी विश्रामगृह असावीत, अशी एक मागणी होती.

(४) अंशत: खरे आहे.

रंगकर्मी आंदोलन महाराष्ट्र यांनी तत्कालीन मंत्री, सांस्कृतिक कार्य यांना सादर केलेल्या निवेदनामध्ये महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात विखुरलेल्या रंगकर्मींची शासन दरबारी नोंद व्हावी, अशी एक मागणी होती.

(५) महाराष्ट्र कलाकार मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून याबाबत शासन सकारात्मक आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.